Vol 6 Issue 1 July 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 1 | July - 2016

Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal
RNI : MAHMUL/2011/38887
ISSN No: 2231-5063
Impact Factor 2.2052 (UIF) [Yr. 2014]
3.4052 (UIF) [Yr. 2015]
4.6052 (UIF) [Yr. 2016]

GRT Golden Research Thoughts

# चिटणीसांनी बखरीमध्ये निर्माण केलेली संभाजी राजांची अनैतिहासिक प्रतिमा

सोमवंशी गिरीधर नागोराव
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग , श्री .छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा.

**प्रस्तावना—**

मल्हार रामराव चिटणीस हा एकमेव बखरकार आहे.ज्यांनी शिवाजी महाराज, संभाजी राजे, राजाराम या तिघांच्या जीवनावर बखरी लिहल्या. त्यांनी या बखरी दुसरे शाहू महाराज ऊर्फ आबासाहेब सातारकर हयांच्या आज्ञेने लिहल्या आहेत. मल्हार रामराव चिटणीस हे सातारकर छत्रपती धाकटे शाहू यांचे चिटणीस होते. सुप्रसिध्द खंडो बल्लाळ चिटणीस यांचे ते पर्णतू (बाळाजी आवाजी – खंडोबालाल – जिवाजी – रामराव – मल्हारराव ) होते. चिटणीसाच्यां वंशातील बाळाजी आवाजी चिटणीसाला राजा विरुध्दच्या कटात हात असल्याच्या संशयावरुन संभाजी राजांनी देहान्ताची शिक्षा दिलेली होती. चिटणीस घराण्याला या गोष्टीची राग होता. त्यामुळे चिटणीसाने आपल्या बखरीमध्ये सभांजी राज्यांची अनैतिहासिक प्रतिमा निर्माण केली आहे. चिटणीसांनी सप्तप्रकरणात्मक चरित्र (1924) ही बखर शिवाजी महाराजांच्या जीवनावर व श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे (1930) मध्ये संभाजीराजे व राजाराम महाराज याच्यां जीवनावर लिहली.



**सप्तप्रकरनात्मक चरित्र :—**

सप्तप्रकरणात्मक चरित्र ही बखर शिवाजी महाराजांच्या जीवनावर लिहली आहे. त्यामुळे शिवचरित्रांच्या अनुशंगाने संभाजी महाराजांची माहीती मिळते. संभाजी राजे दिलेरखानाकडे जाण्यामागचे कारण तो असे सांगतो. ''संभाजी महाराजांची मर्जी एक प्रकारची ! कोण्हे एके दिवशी हळदकुंकू समारंभ, शीतलगौरी ; यास सर्व सुवासिनी स्त्री राजवाडयात येणार त्यात कोण्ही रुपवान स्त्री आली तिजला महालांत नेऊन बलात्कार अविचार जाला. हे वन्नत्त महाराजांसही समजले. ते समयी बहुत तिरस्कार येऊन बोलले. जे '' राज्याचे अधिकारी हे अगभ्यागमन श्रेष्ठ वर्णाचे ठायी जाले. सर्व प्रजा हे राज्यांचे कुटूंब आप्तसमान हे पुत्र जाले तरी काय करावयाचे ? यांचा त्याग करीन शिक्षा करीन '' ऐसे आग्रह करुन बोलले ही बातमी सभांजी महाराज यास समजली. त्यावरुन दोन घोडियावरी आपण व स्त्री ऐसे बसोन, पाच पंचवीस माणसे मावळे आपले खासगीचे जे घेउन रात्रीसच निघोन पाचडास असता तेथून गेले. ते वेळे दिलेरखान औरगांबादेस होते त्यांजपाशी गेले.(1) मल्हार रामराव चिटणीसांनी दिलेले कारण कोणत्याही बखर कारांनी दिलेले नाही.

सभांजी राजे दिलेरखानच्या गोटातुन परत आल्यानंतर पन्हाळयावरील पिता पुत्राच्या भेटीत जे संभाषण झाले. त्यांचा संदर्भ चिटणीस वेगळाच देतो." ते समयी एकांती बसवून "तुम्ही सदन्नशं तुम्हासाठी राज्य किती संपाहिले ? याचे अधिकारी तुम्ही सर्व प्रजा हे तुमचे कुंटूब लेकरांचे ठायी मोजावे राजे लोक तुम्ही शतावधी स्त्रिया (शी) लग्न केले असता. अथवा शक्तीनुसार शतावधी उपस्त्रिया नाटक शाळा ठेवुन (वर्तन) केले असता युक्त आहे. परंतु अविचार अगभ्यागमन करणे व परस्त्री बलात्कार हे दोन्ही यशक्षयास कारण पूर्वी मोठेमोठे राजे व रावणदिक राज्यकर्ते या दोषेकरुन राज्य (श्रयास) व कुलशयास गेले. राज्यक्षयाचे कारणे योग्य न होय.(2) अशा रितीने समाधानकरुन

पन्हाळा प्रांत खर्चास नेमुन नजरबंदीत ठेऊन महाराज रायगडी गेल्याचे सांगतो. पुढे सभासदाप्रमाणेच चिटणिसाने शिवाजी महाराजाकडुन संभाजी राज्याचे भविष्य वदवुन घेतले आहे. ती सभासदाची हुबेहूब नक्कलच आहे.

### *छत्रपती संभाजी महाराजावरील बखर :–*

या बखरीमध्ये मल्हार रामराव चिटणिसाने संभाजी महाराजांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मन्नत्यूनंतरचा संपुर्ण जिवनाचे वर्णन केले आहे. परंतु बखरीतील माहीती काल्पनिक व अनैतिहासीक आहे. चिटणिस लिहतो. '' महाराज यांनी आज्ञा केली आहे की, संभाजी महाराज यांची उग्र प्रकन्नती यास राज्य आवरणार नाही. सर्वांचा नाश करुन आपणही नाश पावतील औरंगजेब महाशत्रु भागानगर प्रांतासमीप येवुन पावला त्याचा पराभव याचे वस्तु होणार नाही. राजाराम सुबूध्द व यांचे हाते राज्य रक्षण होऊन सर्वांचे कल्याण घडेल. त्या अर्थी संभाजी राजे यास आहेत. तसेच तेथील बदोवस्त करवुन कैदेत राखुन राजाराम यासच घेउन राज्य रक्षूण कारभार चालववावा.(3) चिटणीस असे लिहतो शिवाजी महाराजांच्या निधनानंतर राणी सोयराबाईच्या पुढारपणाखाली राजाराम महाराजांस गादीवर बसवण्याच्या कटात सरसेनापती हंबीरराव मोहीते होता; पण वास्ताविक हंबीरराव मोहीते यांनीतर संभाजी महाराजांना मदत करुन हा कट उधळुन लावला आहे.

या वेळी संभाजी राज्यांचा बदोबस्तासाठी रायगडावरुन जी पत्रे गेली. ती बाळाजी आवजीच्या हातची नव्हती ती त्याच्या पुत्राच्या हातची होती. अशी मल्हार रामरावाने कथा रचलेली आहे. ती काल्पनिक आहे. ऐवढेच नाही तर, मल्हाररावांनी संभाजी महाराजांवर सोयराबाई साहेबांना भिंतीत चिणोन मारल्याचा आरोप याच बखरीत केला आहे. तो असा " वाडयात आले. सोयराबाईसाहेब याच्यापाशी जाऊन बाईसाहेब कोठे आहेत म्हणुन बहुत क्रोधे करून विचारले ते समयी जवळील बायका सर्व भये करून निघाल्या. तुम्ही राज्य लोभास्तव महाराजास विषप्रयोग करून मारले असा आरोप शब्द बोलुन कोनाडा भिंतीस करून त्यात सोयराबाई साहेबास चिणोन दुध मात्र घालीत जावे असे सागुन आता पुत्रास घेवुन राज्य करावे असे बोलीले त्यानंतर तीन दिवस ती तशीच होती. तिसरे दिवशी प्राण गेला.(4) वास्तवीकता यापेक्षा वेगळी आहे संभाजी महाराज रायगडावर आल्यानंतर सोयराबाई साहेब एक वर्षांहुन आधिक काळं जिवंत होती. तसेच बाळाजी आवजीच्या वधासंबधीही मल्हार रामराव सत्येतिहास सांगत नाही.

संभाजी महाराजांच्या कारभार संबधी जे मल्हार रामराव चिटणिसाने बेबंदशाहीचे चित्र रेखाटले आहे. ते वस्तुनिष्ठ नाही. '' न्यायाची रित राहीली नाही देवब्रम्हाणांचे ठायीही निष्ठा राहीली नाही.'' असे आचरण धरिले एक कबजी सागंतील ते प्रमाण(5) चिटणिसांचे हे लिखाण तत्कालीन कागदपत्रातील मजकुरांशी सुसंगत वाटत नाही संगमेश्वर येथील संभाजी महाराजांची कैद कबजीच्या नादाने बेहोश होऊन राजा कैदेत पडला. हा वन्नत्त ही काल्पनिक असत्यावर आधारीत आहे.

मल्हार रामरावाने संभाजी महाराजांची औरंगजेबच्या कैदेतील व वधासंबधी अनैतिहासीक माहीती दिलेली आहे. तो असे लिहीतो जेव्हा संभाजी महाराजांना कैद करून औरंगजेबासमोर उभे केले तेव्हा तरूण तडपदार सुदंर संभाजी पाहुन बादशाहाच्या मनात संभाजीना मुस्लमान करण्याचा विचार आला. त्यांनी संभाजीस विचारायला पाठविले की, ''तुम्ही बाटावे म्हणजे जीव वाचवुन तुमची दौलत तुमचे स्वाधिन करितो त्यावरून राजे यांनी उत्तर केले की, '' बाटा म्हणता तरी ही गोष्ट घडावयाची नाही. ज्या अर्थी कैदेत आलो तेव्हा वाचणे ते काय ? तुमचे विचारास येईल ते करावे तथापी तुमची बेटी दयावी. म्हणजे बाटतो ऐसे उत्तर सांगुन पाठविले.(6) त्यावर बादशहा क्रोधित झाला. व त्याने संभाजी चे शिरच्छेद करावयास सांगीतले. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला मुलगी मागण्याचा प्रश्न येत नाही. कारण संभाजी राजे जेव्हा कैद झाले त्यावेळेस विवाहाच्या योग्य अशी औरंगजेब बादशहाची एक ही मुलगी नव्हती. चिटणिसाने रंगवलेली काल्पनिक कथा आहे.

### *निष्कर्ष :–*

(1)मल्हार रामराव चिटणिसांनी या बखरी संभाजीच्या कारकिर्दीच्या दिड शतकानंतर लिहील्यामुळे त्यामध्य सत्यता असणे कठिण आहे.
(2) मल्हार रामराव चिटणिसाने संभाजी महाराजां विषयी लेखन पूर्वग्रहदूषित होऊन केले आहे.
(3)चिटणिसाचा लेखनाचा रोख संभाजी महाराजांस बदनाम करण्याचा आणि बाळाजी आवजीची प्रतीमा उजळविण्याचा आहे.
(4) चिटणिस बखरीतील लेखनामुळे संभाजी महाराजांची एक अनैतिहासीक प्रतीमा तयार झाली आहे.
(5) चिटणिस हा एकमेव बखरकार आहे. जाने छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र लिहले. परंतु ते लिखाण अनैतिहासीक असल्यामुळे संभाजी महाराजाविषयी प्रारंभीच्या काळामध्ये गैरसमज निर्माण झाले.

### *संदर्भ सुची :–*

(1) हेडवारकर र.वि. (संपा) ; मल्हार रामराव चिटणिस विरचित शतकर्ते श्री. शिवछत्रपती महाराज यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र ; व्हीनस प्रकाशन पुणे 1967.
(2) उपरोक्त पन्न. 238
(3) मल्हार रामराव चिटणिसविरचीत श्रींमत छत्रपती संभाजी आणि थोरले राजाराम महाराज यांची चरीत्र , संपा हेरवाडकर र.वि 2
(4) हेरवाडकर र.वि (संपा) ; मल्हार रामराव चिटनिसविरचीत श्रीमंत छत्रपती संभाजी आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्र ; व्हीनस प्रकाशन पुणे 1986. पन्न.1.2
(5) उपरोक्त पन्न. 6
(6) उपरोक्त पन्न. 21
(7) उपरोक्त पन्न. 28.29

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org